रजि.नं. : ई-६९, अहमदनगर
# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/ H608 /२०२२
दिनांकः- 2 5 MAR 2022

प्रति,

---------------------------

-----------------------

**विषयः- साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेसाठी मंदिर परिसरात विविध ठिकाणी ताडपत्रीचे छत, एम एस पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले कापडी मंडप व्यवस्था करणेकामाचे सिलबंद दरपत्रक देणेबाबत...**

साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेसाठी मंदिर परिसरात विविध ठिकाणी ताडपत्री छत असलेले खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे मंडप उभारणी करावयाची आहे.

| अ.क्र. | तपशिल | साईज | परिमाण | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | ताडपत्रीचे छत, एम एस पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले कापडी मंडप उभारणे. | | | |
| ०१ | मंदिर परिसर गेट नं. ०३ ते गेट नं. ०४ पर्यंत (आतील बाजू) | ४०५'x१८' | ७२९० चौ.फूट | ८३ दिवसाकरीता |
| ०२ | शांतिनिवास इमारत दक्षिण बाजू (व्हीआयपी साईभक्तांचे दर्शन रांगेसाठी) | १२५'x१५' | १८७५ चौ. फुट | |
| ०३ | पिंपळवाडी रस्त्यावर गेट नं. ०१ ते गेट नं. ०२ (पुर्वबाजू) | ८७०'x १५' | १३०५० चौ.फूट | |
| ०४ | लेंडीबागेत दत्त मंदिर ते गेट नं. ०४ पर्यंत | १६५'x१५' | २४७५ चौ. फुट | |
| ०५ | संस्थान बस थांब्याकरीता हॉटेल इंटरनॅशनल समोर नगर मनमाड रस्त्याचे पूर्व बाजू फुटपाथवर | २०'x१०' | २०० चौ. फुट | |

तरी उपरोक्त तपशिलाप्रमाणे मंडप उभारणेकामी सिलबंद दरपत्रके खालील अटी-शर्तीस अनुसरुन देणेचे करावे.

**अटी –शर्ती .**

१. यापुर्वी ज्यांनी कोटेशन्स सादर करुन मंडप उभारणीचा कार्यादेश प्राप्त झालेनंतर मागणीनुसार मंडप उभारणी अथवा साहित्य पुरविलेले नाही, अशा कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

२. उपरोक्त नमूद मंडपापेक्षा जास्त आकाराचे / जादा मंडप उभारणी करणेबाबत संस्थानकडून सुचना / आदेश देण्यात आल्यास, मंजूर दरानेच जास्तीचे / जादाचे मंडप उभारणीचे काम कोटेशन धारकास करावे लागेल.

३. उपरोक्त नमूद मंडपापेक्षा कमी अथवा जादा आकाराचे मंडप उभारणी करावी लागल्यास, त्याप्रमाणात मंजूर दराने रक्कम कमी केली जाईल अथवा प्रत्यक्षात ज्या आकाराचे मंडप उभारणी करण्यात आली असेल, त्याप्रमाणात मंडप उभारणीची रक्कम मंजुर दराने अदा केली जाईल.

४. मंडप उभारणीचा कार्यादेश मिळालेनंतर, मंजूर दराने होणा-या एकूण रक्कमेच्या ०५ (पाच) टक्के रक्कम अनामत म्हणून संस्थानकडे त्वरीत जमा करावी लागेल.

कार्यादेशातील मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच कार्यादेश दिल्यानंतर मंडप उभारणीचे काम नाकारल्यास संस्थानकडे जमा असणारी बयाना रक्कम / अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

कोटेशन सोबत भरावयाची बयाना रक्कम रु.४,१००/- मात्र डि.डीव्दारे अथवा संस्थानचे पावतीव्दारे भरणे आवश्यक आहे.

सरकारी नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल.

मंडप उभारणीसाठी वापरण्यात येणारे साहित्य उदा. लोखंडी कॉलम, कैच्या,एम.एस. पाईप, लाकडी बल्ल्या, गोल्टे, बांबु, ताडपत्री, कापड इत्यादी मजबुत, टिकाऊ व सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य असलेले वापरावे लागेल.

मंडपाचे छताचे कापड स्वच्छ व सुशोभित असावे. शक्यतो नवीन कापड वापरणे योग्य राहील. फाटलेले, खराब, वेडीवाकडी शिवलेले असलेले कापड नाकारण्यात येईल.

०. मंडपाचे मोजमाप बाहेरील बल्ल्यांचे / पाईपचे आत आत मोजली जातील.

१. मंडपाचे छतासाठी वापरण्यात येणारे कापड स्वच्छ व सुशोभित असल्याबाबत प्रथम बांधकाम विभागाकडून तपासून घ्यावे व नंतर त्याची बांधणी करावी. खराब कापडाची बांधणी केल्यास व नंतर ते कापड बदलावे लागल्यास त्याबद्दल जादा भरपाई अथवा रक्कम अदा केली जाणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकावर राहील. तसेच ठेकेदार यांनी मंडप उभारणीचे साहीत्य बांधकाम विभागामार्फत तपासून घेऊन, संस्थान अभियंता यांनी परवानगी दिलेनंतरच मंडप उभारणीचे काम सुरु करावे.

२. मंडपाचे साहित्य / सामान आणने – नेणे, त्याची वाहतूक करणे, ते संभाळणे, नैसर्गिक आपत्तीपासून व अपघात यापासून त्याचा बचाव करणे हे सर्वस्वी कोटेशन धारकाची जबाबदारी असून, त्याबाबत संस्थानमार्फत कुठल्याही स्वरुपात मदत / नुकसानभरपाई देणार नाही. तसेच मंडप उभारणी करतेवेळी बॅरेकेट / दोर लावावेत. जेणे करुन साईभक्तांना मंडप उभारणीचा त्रास होणार नाही. काम चालू असतांना साईभक्तांना इजा झाल्यास, जिवीत अथवा वित्त हानी झाल्यास त्यास मंडप ठेकेदार जबाबदार राहील.

१३. मंडप उभारणीचे कालावधीमध्ये मंडप झुकल्यास / कापड फाटल्यास अथवा इतर कोणत्याही प्रकारचे त्याचे नुकसान झाल्यास ते त्वरीत निविदाधारकांने स्वखर्चाने दुरुस्त करुन / बदलुन द्यावयाचे आहे.

१४. मंडप उभारणी करीता मंडपाची फ्रेम तयार झालेनंतर छता करीता कापड बांधणीपुर्वी सदरची फ्रेम बांधकाम विभागामार्फत तपासणी करुन घ्यावे.

१५. मंडप, स्टेज तसेच इतर अनुषंगीक व्यवस्था केलेनंतर ती भक्कम स्वरुपाची असलेबाबतची खात्री इकडील विभागामार्फत करुन घेणेत यावी. अन्यथा कार्यक्रमाचे वेळी अडथळा आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मंडप धारकांवर राहील व दंडास पात्र ठरेल याची नोंद घ्यावी.

१६. मंडप उभारणीचे कालावधीमध्ये / मंडपाची उभारणी पूर्ण झालेनंतर, मंडपाची देखरेख अथवा देखभाल दुरुस्ती करणेसाठी कर्मचारी / मजूर मंडप ठेकेदारने नियमित हजर ठेवावयाचे आहेत. तसेच मंडपाविषयी सुचना / आदेश देणेसाठी एखाद्या जबाबदार कर्मचा-याची नेमणूक ठेकदाराने करावयाची असून, या संबंधीत जबाबदार कर्मचा-याने वेळोवेळी बांधकाम विभागाशी संपर्क साधावयाचा आहे. तसेच या संबंधीत जबाबदार कर्मचा-याने बांधकाम विभागाकडील नोंदवहीत हजेरी बाबतची नोंद व स्वाक्षरी करावयाची आहे.

१७. मंडप उभारणीचे दर भरतांना सर्वसमावेशक असे दर द्यावेत. वाहतुक,हमाली अथवा इतर कोणताही खर्च संस्थानमार्फत वेगळा दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१८. मंडप उभारणी कामाची बीले लेखाशाखेमार्फत RTGS ने अदा करण्यात येत असल्याने, आपले / आपल्या संस्थेचे बँकेत ज्या नांवाने बँकेत खाते आहे ते नांव, खाते नंबर, बँक IFC कोड नंबर तत्सम माहीती निविदेत नमूद करावी जेणे करुन बिल अदा करणेस अडचण येणार नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
शिर्डी :पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.


१९. सरकारी नियमानुसार आपणांस आपला स्वतःचा / फर्मचा पॅन नंबर वGST Registration No. इ. माहीतीचे छायांकीत प्रती देणे बधनकारक राहील.

२०. दरपत्रक भरण्यापुर्वी जेथे – जेथे मंडप टाकावयाचे आहेत, त्या कार्यस्थळांची प्रथम समक्ष पहाणी करावी व नंतरच निविदा भरावी. ब-याच वेळेस प्रत्यक्ष मंडप उभारणी करण्याचे वेळेस ऐनवेळी अडचणी / तक्रारी केला जातात. त्याबाबत तक्रारी ऐकून घेतल्या जाणार नाहीत.

२१. मंडप उभारणीचे बिल सादर करणेपूर्वी, संस्थान प्रतिनिधी व निविदाधारकांनी एकत्रपणे मंडपाची मापे व मंडपाचे फोटो घ्यावयाची असून त्याबाबतचा अहवाल दोघांच्या नाव, पदनाम व स्वाक्षरीनिशी कार्यालयात जमा करावयाचा आहे व या अहवालाप्रमाणेच निविदाधारकांने बिल तयार करावयाचे आहे.

२२. मंडप उभारणीचे बिल सादर करतांना, कार्यादेशातील व नियमाप्रमाणे पूर्ण तपशिल असणे आवश्यक आहे. संक्षिप्त अथवा त्रोटक स्वरुपात उल्लेख करु नये, अन्यथा बिल अदा केले जाणार नाही.

२३. कोणतेही कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करणेचा पूर्णतः अथवा अंशतः मंजूर करणेचा अथवा नामंजूर करणेचा हक्क संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधकारक असणार नाही.

२४. सदरील व्यवहाराबाबत वाद उत्पन्न झाल्यास तो राहाता न्यायालयाचे न्यायकक्षेत राहील.

२५. उपरोक्त शती व अटीत काही बदल, सुधारणा करणेचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवला आहे.

२६. कोटेशनधारकाच्या कोणत्याही अटी – शर्ती संस्थानवर बंधनकारक राहणार नाहीत. त्याचा विचार केला जाणार नाही.

२७. उपरोक्त अटी – शर्ती पैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी – शर्तीचा भंग झाल्यास बयाना / अनामत रक्कम संस्थान जमा होणेस पात्र राहील.

२८. तसेच मंडप, पार्टीशन, बॅरेकटींग, कमानी व स्टेज उभारणीचे परिशिष्टामध्ये नमूद केले प्रमाणे मंडपाची उभारणी न केल्यास मंडपाचे देयक अदा केले जाणार नाही अथवा दरात कपात केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

२९. निविदेत नमूद केलेल्या दरांबाबत चर्चा / वाटाघाटी केल्या जाणार नाहीत. त्यासाठी कोटेशनधारक यांनी अंतिम दर द्यावेत.

३०. कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार संस्थान प्रशासनाचा राहिल.

३१. मुदतीत न आलेल्या / मुदतीनंतर आलेल्या कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

३२. कोटेशनधारकाने मंडप उभारणीस नकार दिल्यास ते काम दुस-या ठेकेदाराकडून करुन घेण्यात येईलवसदर कामाची ठेकेदाराचे सुरक्षा अनामत रक्कम व जादाची रक्कम ठेकेदाराकडून वसुल करण्यात येईल.

३३. काम पूर्ण करण्यासाठी दिलेल्या कालावधीत काम पूर्ण न केल्यास रु.५००/- प्रतिदिन पर्यंत दंडाची आकारणी करण्यात येईल.

३४. आपले सिलबंद कोटेशनवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे सादर करुन कोटेशनवर कामाचा उल्लेख करावा अथवा कोटेशन पत्राचा जावक क्रमांक व दिनांक लिहण्यात यावा ही विनंती.

३५. आपले सिलबंद कोटेशन संस्थान कार्यालयात दि.२९/०३/२०२२ अखेर ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी सादर करावे.

25.3
(एस.एम.जोरी)
**प्र.कार्यकारी अभियंता,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने.

मुंबई :साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४